साप्ताहिक

# विश्वनायक

Email: vishvanayak94@gmail.com

• संपादक : बिलाल शेख • VISHVANAYAK Mo.8686888898




■ बीड (महाराष्ट्र) ■ साप्ताहिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०१ ■ अंक - ०६ ■ मंगळवार दि.०३ फेब्रुवारी २०२६ ■ पीआरजीआय रजि.नं.- एमएचबीआयएल/२५/ए४९८० ■ किंमत २ रू. ■ पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Weekly ■ BILINGUAL ■ Year - 01 ■ Issue - 06 ■ Tuesday Dt. 03 February 2026 ■ PRGI.REG.No. MHBIL/25/A4980 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

# जमीन वहितीदारावर गुन्हे अन् शासकीय निधीचा पाऊस!

## घोसापुरीतील गट क्र. ९२ मध्ये नेमकं शिजतंय काय; 'त्या' पत्राचा विसर पडला का?

**बीड । प्रतिनिधी**
**मौजे घोसापुरी (ता. जि. बीड) येथील गट क्रमांक ९२ मधील गायरान जमिनीवर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (RTO) नियोजित इमारतीसाठी मंजूर झालेला १३ कोटी रुपयांचा निधी आता मोठ्या वादात सापडला आहे. सदर जमीन १९८७ पासून वहितीखाली असून त्याबाबत न्यायालयात खटला प्रलंबित असतानाही, प्रशासनाने वस्तुस्थिती लपवून हा निधी मंजूर करून घेतल्याचा गंभीर आरोप स्थानिक ताबेदारांनी केला आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, घोसापुरी येथील गट क्र. ९२ मध्ये काही कुटुंबे गेल्या ३८ वर्षांपासून (१९८७ पासून) वास्तव्यास असून तिथे शेती करत आहेत. या जमिनीवर मालकी हक्कासाठी 'लक्ष्मण विरुद्ध जिल्हाधिकारी' (नि.दा.क्र. १५४/२०१७) हा खटला बीड न्यायालयात अद्याप प्रलंबित आहे. विशेष म्हणजे, या कुटुंबांना शासनाकडून घरकुल आणि सौर ऊर्जेसारख्या योजनांचा लाभही मिळालेला आहे.

**पर्यायी जागा असताना घोसापुरीचाच आग्रह का?**

तक्रारदारांचे म्हणणे आहे की, घोसापुरी येथील जागा वादात असल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी यापूर्वीच मौजे पिंपरगव्हाण (गट क्र. ५९) येथे १२ एकर शासकीय जमीन आरटीओ कार्यालयासाठी उपलब्ध करून दिली आहे. त्या ठिकाणी सध्या 'ब्रेक टेस्ट ट्रॅक'चे कामही सुरू आहे. असे असतानाही, केवळ राजकीय दबाव आणि भूमाफियांच्या हितासाठी घोसापुरी




येथील वादग्रस्त जमिनीवर १३ कोटींचा निधी खर्च करण्याचा घाट घातला जात असल्याचा आरोप होत आहे. तसेच २०१८ मध्ये उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद विभाग यांनी पत्राद्वारे (जा.क्र. १३५/२०१८) स्पष्ट केले होते की, ३२ एकरपैकी केवळ २ एकर जागा निर्विवाद असून उर्वरित ३० एकर जागेचा फेरफार करावा. हे स्पष्ट आदेश असतानाही, स्थानिक आरटीओ अधिकाऱ्यांनी शासनाची आणि पालकमंत्र्यांची दिशाभूल करून पूर्ण निधी घोसापुरीसाठी खेचून आणल्याचा दावा वहितीदारांनी केला आहे. आपल्या जमिनीचा ताबा वाचवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यांवर कलम ३५३ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कोणतीही नोटीस न देता सुटीच्या दिवशी मोजणी करणे, पोलिसांचा धाक दाखवणे आणि राजकीय दबावातून आम्हाला बेघर करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे पीडित शेतकऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे.

### न्यायालयीन लढाईची तयारी..



या संदर्भात ॲड. अविनाश गंडले यांनी आक्रमक पवित्रा घेतला असून, जर हा १३ कोटींचा निधी पिंपरगव्हाण येथील निर्विवाद जागेवर वर्ग केला नाही, तर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात धाव घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. न्यायालयात केस सुरू असताना प्रशासनाने केलेला हा हस्तक्षेप न्यायालयाचा अवमान करणारा आहे, असेही त्यांनी नमूद केले. प्रशासन जाणीवपूर्वक चुकीची माहिती देऊन वादग्रस्त जागेवर बांधकाम करू पाहत आहे. वादीचा ३८ वर्षांचा ताबा आणि न्यायालयातील प्रलंबित खटला विचारात न घेता जर निधी खर्च केला, तर आम्ही कायदेशीर मार्गाने या भ्रष्ट साखळीला उच्च न्यायालयात खेचू.

**– ॲड. अविनाश गंडले (विधीज्ञ, बीड)**

### मागणी आणि इशारा..

वहितीदारांनी जिल्हा प्रशासन आणि नियोजन विभागाकडे खालील मागण्या केल्या आहेत. १. घोसापुरी येथील गट क्र. ९२ ला दिलेला १३ कोटींचा निधी तातडीने रोखण्यात यावा. २. हा निधी पिंपरगव्हाण येथील निर्विवाद जागेवरील इमारतीसाठी वर्ग करण्यात यावा. ३. घोसापुरी येथील जागेवर कोणतेही बांधकाम करण्यास परवानगी देऊ नये. जर हा निधी वर्ग केला नाही, तर आम्ही मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करू. तसेच, आमच्या जीवितास काही बरे-वाईट झाल्यास त्यास प्रशासन आणि संबंधित भूमाफिया जबाबदार राहतील, असा इशाराही या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# गेवराई नगर परिषद च्या भाजपा नगरसेवक पतीला सत्तेचा माज चढला

## गेवराई नगर परिषद प्रशासनाचे व सत्ताधाऱ्यांची निष्क्रियतेमुळे नागरिकांना नाली स्वच्छ करावी लागली

**गेवराई । प्रतिनिधी**
गेवराई शहरातील मोमीन पुरा भागात बऱ्याच दिवसा पासून नाली कचऱ्याने तुडूंब भरले होते. या मुळे नाली ब्लॉक झाली पाणी निघत नाही त्या मुळे या भागातील नागरिकांनी सदर गोष्ट या भागातील नगर सेवकाला सांगितली तसेच नगर परिषद स्वछता निरीक्षक सनी कांबळे याना व पत्रकाराच्या माध्यमातून व्हाटअप्स द्वारे तक्रार केली तक्रार केल्या मुळे नाली वरची वर वर घाण काढण्यात आली आणि ब्लॉक तसेच ठेवण्यात आले त्या मुळे पाणी निघत नाही.

नगर सेवक पती (किशोर धोंडलकर) ची नागरिकाला व पत्रकाराला अरे रवारीची भाषा अमरसिंह पंडित चा नाव घेत सांगितले की तुम्ही पैसे घेता त्यांच्या कडून आणि विरोधात काम करतात अमरसिंह पंडित याच्या कडे टेंडर होते त्या वेळेस का नाही सांगितले त्यांना फोन लावायचा नाही ठेवा फोन. नगर परिषद गेवराई प्रशासनाला आणि स्थानिक नगर सेवकाला वारंवार सांगून व प्रसारमाध्यम मध्ये बातमी प्रकाशित करून ही सत्ता धारीला व प्रशासनाला जाग येत नाही असे दिसत आहे त्या मुळे या भागातील रहिवासी नागरिकांनी स्वतः सदर नाली मधील तुंबलेले पाणी काडून दिले जर नागरिक स्वतः हे काम करीत असेल तर स्वच्छता टेंडर फक्त शासनाचा पैसा हडपण्यासाठी देण्यात आले का असा प्रश्न निर्माण होत आहे प्रशासनाने व सत्ताधारी नी जनाची नाही तर मनाची लाच राखावी असी या भागातील नागरिकांकडून बोलण्यात येत आहे.



# विहिरीत पडलेल्या निलगाईचा जिव वाचविण्यात यश

**कडा । प्रतिनिधी**
आष्टी तालुक्यातील शेरी खुर्द येथील विहिरीत पडलेल्या नील गाईला प्राणी मित्रांसह शेतकरी व नागरिकांनी विहिरीतून सुखरूप बाहेर काढले. शेरी खुर्द येथील हनुमंत हरिभाऊ ढोबळे हे शेतात काम करत असताना विहिरीत काहितरी पडल्याचा मोठा आवाज झाला. हा आवाज ऐकून विहिरीकडे गेले असता वेगळाच प्राणी पडल्याचे दिसले त्यांनी वस्तीवरील लोकांना व कडा येथील प्राणी मित्र,जिवदया रेस्कू टिमला या घटनेची माहिती दिली थोड्याच वेळात हे सर्वच त्या विहिरीजवळ आले.

तब्बल तीनशे किलो वजन व टोकदार शिंगे असलेल्या प्राण्याला बाहेर काढणे हे सोपे नव्हते. परंतु प्राणी मित्र नितीन आळकुटे, संदिप पाचपुते, आणि गणेश पवळ हे धाडस करत विहिरीत उतरून त्या नीलगायीला दोरखंडाच्या साह्याने चांगले बांधून घेतले व त्यानंतर सर्वांनी त्या दोरखंडाला ओढत नीलगायीला सुरक्षितपणे बाहेर काढले. यावेळी शैलेंद्र मिश्रा, अविनाश ढोबळे, स्वप्निल ढोबळे, दादा ढोबळे, ऋषिकेश ढोबळे, भरत कदम, शरद नलावडे, आबासाहेब ढोबळे, सतिष ढवण, विठ्ठल भालेराव, तुषार ढोबळे, ओम मोरे यांच्या सह इतर जणांनी आपल्या जिवाची पर्वा न करता या मुक्या जीवाला विचविण्यासाठी प्रयत्न केले. बाहेर काढल्यानंतर दमलेल्या नीलगायी ने पाच मिनिटे आराम करून वेगाने निसर्गाच्या सानिध्यात धाव घेतली. हे चित्र पाहून त्या नीलगायीला सुरक्षितपणे बाहेर काढल्याचा सर्वांना आनंद झाला.

# जमजम कॉलनीत भरवस्तीत घरात घुसून कुटुंबावर भीषण हल्ला

## अल्पवयीन मुलींसह वृद्धांना बेदम मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**
शहरात गुंडांची दहशत दिवसेंदिवस वाढत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. बीडमधील जमजम कॉलनी भागात २७ जानेवारी रोजी संध्याकाळी एका कुटुंबावर टोळक्याने घरात घुसून जीवघेणा हल्ला केल्याची संतापजनक घटना घडली आहे. या हल्ल्यात वृद्ध आजी-आजोबांसह तीन अल्पवयीन मुलींनाही बेदम मारहाण करण्यात आली असून घरातील साहित्याची मोठ्या प्रमाणावर तोडफोड करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २७ जानेवारी २०२६ रोजी संध्याकाळी ७ ते ७:४५ च्या सुमारास मोहम्मद हनीफ याच्या घरासमोर आरोपी इकराम खान आणि त्याची पत्नी शेख अनायाच्या आजी-आजोबांना बेदम मारहाण करत होते. आयान आणि त्याच्या १७, १२ आणि ११ वर्षांच्या तीन बहिणींनी मध्यस्थी करून हे भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी काही लोकांनी हस्तक्षेप केल्याने भांडण मिटले आणि पीडित कुटुंब आपल्या घरात गेले. मात्र, हा वाद एवढ्यावरच थांबला नाही. काही वेळातच इकराम खान, त्याचा भाऊ इरफान खान, मुलगा इंझमाम खान, भाऊ रिझवान खान, सैफ खान अख्तर खान आणि इतर दोन अनोळखी इसम हातात फावड्याचा दांडा व इतर हत्यारे घेऊन पीडितांच्या घरात घुसले.

**मुलीची छेडछाड आणि अमानुष मारहाण**

आरोपी रिझवान खान याने शेख अयानच्या आजोबांना धरून ठेवले, तर इरफान खान त्यांना लाथाबुक्क्यांनी मारू लागला. यावेळी १७ वर्षीय अलिना बेगम हिला वाचवण्यासाठी पुढे आली असता, आरोपी इंझमाम खान याने अत्यंत नीच कृत्य केले. त्याने अलिनाचा विनयभंग करत तिला केसांना धरून खाली पाडले आणि तिचा कुर्ता फाडला.

**घराची तोडफोड आणि मोबाईलची चोरी**

घटनेचा व्हिडिओ काढणाऱ्या अनाया आणि आयेशा या दोन लहान मुलींनाही आरोपी इकराम खान याने धक्काबुक्की करून खाली पाडले. त्यांच्या हातातील मोबाईल हिसकावून घेत बाहेर उभ्या असलेल्या टोयोटा लिजेंडर गाडीत टाकून दिले. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी घरातील पाण्याचा हंडा, स्टीलची टाकी फोडून नुकसान केले. तसेच अंगणात उभी असलेली धरारहर ठ१५ मोटारसायकल ओढत रस्त्यावर नेऊन मोठ्या दगडांनी तिची तोडफोड केली.

मदतीला आलेल्या मामांनाही मारहाण करून आरडाओरडा ऐकून पीडितांचे दोन मामा, आदिल आणि अखिल तिथे आले असता, आरोपींनी त्यांनाही खाली पाडून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या भीषण कृत्यानंतर सर्व आरोपी त्यांच्या चारचाकी गाडीतून फरार झाले. या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण पसरले असून, भरवस्तीत एका कुटुंबावर झालेल्या या हल्ल्यामुळे लोक हैराण झाले आहेत या पार्श्वभूमीवर इकराम, इरफान खान, इंज्माम खान, रिजवान खान, इकराम खान यांची पत्नी, सैफ व इतर दोन अनोळखी इसमा यांच्या वर भारतीय न्याय संहिता (बी एन एस) २०२३ कायदेअंतर्गत ७४, १८९(२),१९१(२), १९०, ३३३, ११९(१), ११५(२), ३५२, बालकाचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम,२०१२ कायदेअंतर्गत बीड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. पीडित कुटुंबाने याप्रकरणी कठोर कारवाईची मागणी केली आहे.

# साळेगाव येथे पी.एम.श्री शाळा योजनेतील खर्चावर शंका

## साळेगाव शाळेचे मुख्याध्यापक सूर्यकांत काळे चर्चेत

**धारूर । प्रतिनिधी**
केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी पी.एम.श्री डलहेश्र योजनेचा केज तालुक्यातील साळेगाव येथील शाळेत कागदोपत्री खेळ आणि लाखो रुपयांच्या कथित भ्रष्टाचारासाठी वापर केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. के. प्रा. शा. साळेगाव, ता. केज, जि. बीड येथील मुख्याध्यापक सूर्यकांत काळे शासकीय निधीचा गैरवापर, नियमबाह्य खरेदी व प्रत्यक्ष अंमलबजावणीशिवाय खर्च दाखवण्याचे आरोप असलेली तक्रार जिल्हा परिषदेकडे दाखल करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, पी.एम.श्री योजनेअंतर्गत शाळेला मंजूर झालेला वार्षिक निधी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (छएझ २०२०) च्या उद्दिष्टांनुसार प्रत्यक्ष शाळा विकासासाठी वापरणे अपेक्षित असताना, त्या नियमांचे पालन झालेले नाही. प्रत्यक्ष शाळेत कोणतीही ठोस सुधारणा दिसून येत नसताना, मात्र कागदोपत्री विविध उपक्रम राबविल्याचे दाखवून लाखो रुपयांचा खर्च झाल्याचे नमूद करण्यात आल्याचा आरोप आहे. योजनेअंतर्गत साहित्य खरेदी करताना जाहीर निविदा न काढणे, आवश्यक कोटेशन न घेणे, तसेच ठरावीक दुकाने अथवा व्यक्तींच्या नावाने खर्च दाखवून झत्रॠड प्रणालीद्वारे निधी वळवण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. खेळाचे साहित्य, शैक्षणिक साहित्य व इतर साधनसामग्री प्रत्यक्ष शाळेत उपलब्ध नसतानाही खर्च दाखवण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

तक्रारदाराने या कथित गैरप्रकारांची तत्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली असून, ठरावीक कालमर्यादेत चौकशी न झाल्यास आंदोलनाचा इशाराही दिला आहे. चौकशी अहवालाची सत्य प्रत देण्याची व दोषी आढळल्यास संबंधित मुख्याध्यापकांवर निलबंनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. पी.एम.श्री योजनेसारख्या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमाची बदनामी करणारे प्रकार घडले असल्यास, ते शिक्षण व्यवस्थेसाठी गंभीर बाब ठरेल, अशी चर्चा शैक्षणिक वर्तुळात सुरू आहे

# कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी राहुल सूर्यतळ यांची बीड बदली रद्द करा : सय्यद सलिमबापु

## पुन्हा माजलगावचा पदभार देण्यासाठी शिष्टमंडळाद्वारे पोलीस अधीक्षक कामात यांना करणार विनंती

**माजलगाव । प्रतिनिधी**
माजलगाव येथील कर्तव्यदक्ष व जनतेत विश्वास निर्माण करणारे पोलीस अधिकारी राहुल सूर्यतळ यांची बीड येथे करण्यात आलेली बदली तात्काळ रद्द करून त्यांना पुन्हा माजलगाव येथेच पदस्थापना द्यावी, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते, तथा आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलिमबापू यांनी केली आहे. दरम्यान जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक कामात यांची शिष्टमंडळाद्वारे भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी माजलगाव शहरात लोकाभिमुख अधिकारी म्हणून काम केले. कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवत त्यांनी शहराला शिस्त लावण्याचे काम केले. गुन्हेगारीवर कडक कारवाई केली. सर्वसामान्य नागरिक, व्यापारी वर्ग आणि युवकांमध्ये त्यांनी विश्वासाचे वातावरण निर्माण केले होते. त्यांच्या कार्यकाळात अवैध धंदे, दहशत आणि गुन्हेगारी प्रवृत्तीवर मोठ्या प्रमाणात लगाम बसल्याचे नागरिकांनी अनुभवले आहे.



आशा चांगल्या अधिकाऱ्याला लाच प्रकरणाशी संबंध जुळवत राजकारणाचा बळी करून त्यांची बदली करण्यात आली आहे. ही चुकीची बाब आहे.

वास्तविक कर्तव्य बजावताना कोणत्याही दबावाला न जुमानता काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठबळ देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. शहरातील नागरिक आशा प्रामाणिक कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यासाठी नेहमीच प्रोत्साहन देत असून या मागणीला नागरिक, व्यापारी व विविध सामाजिक घटकांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. दरम्यान माजलगावला अशाच धडाडीच्या अधिकाऱ्यांची गरज आहे, असे मत सलिमबापू यांनी व्यक्त करत लवकरच शिष्टमंडळाद्वारे पोलीस अधीक्षक कामात यांची भेट घेणार असून, राहुल सूर्यतळ यांची बीड बदली रद्द करून त्यांना पुन्हा माजलगाव शहर पोलीस स्टेशनचा पदभार द्यावा अशी विनंती सादर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.




# १०० करोड़ में मौत का पुल

मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ने मीरा-भायंदर इलाके में एक फ्लाइओवर बनाया। इस फ्लाईओवर के डिजाइन को लेकर विवाद हो रहा है। सोशल मीडिया पर लोग मजे ले रहे हैं। इस पुल को बनाने वाले इंजीनियर और ठेकेदारों पर तंज हो रहा है। यह चार लेन का फ्लाईओवर अचानक दो लेन में बंट जाता है। अचानक संकरे होने की शिकायतों पर एमएमआरडीए ने भी स्पष्टीकरण दिया है। दुबे ने इस ब्रिज की डिजाइन को आम जनता की सुरक्षा के साथ खिलवाड़ कहा है। सीएम को लिखे पत्र में आनंद दुबे ने कहा कि फ्लाइओवर का डिजाइन ऐसा बनाया गया है कि अचानक वह सिमटता दिख रहा है। इससे आम लोगों की सुरक्षा को लेकर सवाल उठ रहे है और लोग इसे भविष्य में हादसों का ब्रिज बता रहे है, जबकि प्रशासन इसे नियोजित डिजाइन कह रहा है। उद्धव गुट के नेता ने कहा कि फोरलेन का ब्रिज आगे जाकर अचानक दो लेन का ब्रिज हो गया है, क्या एमएमआरडीए ने बिना तैयारी के यह ब्रिज बना दिया है। इससे साफ़ होता है कि एमएमआरडीए, ठेकेदार और कंसल्टिंग कंपनी के खिलाफ जांच कर कड़ी कार्रवाई की जानी चाहिए। उद्धव गुट के प्रवक्ता आनंद दुबे ने इस संबंध में मुख्यमंत्री और उप मुख्यमंत्री को पत्र लिख कर पूरे मामले की जांच कर अधिकारियों, ठेकेदार और कंसल्टेंट के खिलाफ कड़ी कार्रवाई की मांग की है। साथ ही इस ब्रिज को मौत का ब्रिज कहा है। दुबे ने मांग की है कि भविष्य में इस तरह की लापरवाही न हो, इसके लिए संबंधित विभागों, अधिकारियों, ठेकदारों और कंसल्टेंट कंपनी को चेतावनी मिलनी चाहिये। साथ ही ठेकेदार और कंसल्टिंग कंपनी द्वारा पूर्व में किए गए सभी प्रोजेक्ट की निष्पक्ष जांच होनी चाहिए और आम लोगों के जीवन को खतरे में डालने वाली कंपनी को ब्लैक लिस्ट करना चाहिए। अफसरो का कहना है कि गोल्डन नेस्ट सर्कल जैसे व्यस्त जंक्शन पर ट्रैफिक को अच्छे से मैनेज करने के लिए मेट्रो के साथ जुड़ा २+२ लेन का फ्लाईओवर बनाया गया है। यहां दोनों तरफ स्लिप रोड भी दिए गए हैं, ताकि वाहनों का दबाव सही तरीके से कम किया जा सके। जंक्शन से आगे भायंदर ईस्ट की ओर राइट ऑफ वे कम होने के कारण रेलवे फाटक रोड की तरफ १+१ लेन का अलग फ्लाईओवर बनाया गया है, जिसमें मीडियन के साथ अप और डाउन रैंप हैं। इससे बिना रुकावट आवाजाही संभव हो पाती है। यह डिज़ाइन मीरा-भायंदर के सबसे व्यस्त जंक्शनों में से एक को आसानी से पार करने में मदद करता है। साथ ही उपलब्ध जमीन की सीमाओं का भी पूरा ध्यान रखा गया है। भविष्य में फ्लाईओवर को चौड़ा करने का पूरा प्रावधान है। दोनों कैरिजवे के बाहरी तरफ अतिरिक्त १+१ लेन जोड़े जाएंगे, ताकि पूर्व-पश्चिम ट्रैफिक सुचारू रहे। यह प्रस्ताव अभी प्लानिंग स्टेज में है और मंजूरी मिलने के बाद मीरा-भायंदर म्युनिसिपल कॉर्पोरेशन के साथ मिलकर काम होगा। एमएमआरडीए का दावा है कि चार लेन से दो लेन में बदलाव कोई डिजाइन की गलती नहीं है। यह सड़क की उपलब्ध चौड़ाई और भविष्य की यातायात योजना को ध्यान में रखकर किया गया है। एमएमआरडीए के अनुसार, फ्लाईओवर को भायंदर ईस्ट के लिए दो लेन और भविष्य में भायंदर वेस्ट के लिए दो कनेक्टिंग लेन के साथ तैयार किया गया है। चूंकि फ्लाईओवर की दिशा में पहले भायंदर ईस्ट वाला हिस्सा आता है, इसलिए फिलहाल चार लेन से यातायात दो लेन में आ जाता है। बाकी दो लेन को वेस्टर्न रेलवे लाइन के पार भायंदर वेस्ट की ओर भविष्य में जोड़ा जाएगा। एमएमआरडीए के इस फ्लाइओवर को लेकर सोशल मीडिया पर बहस छिड़ गई है। लोग विकास प्राधिकरण पर जमकर गुस्सा उतार रहे हैं। कुछ लोगों ने कहा कि मीरा रोड में सौ करोड़ रुपये में मौत का पुल बनाया गया है। वहीं कुछ लोग मजाक में पूछ रहे हैं कि इस पुल को बनाने वाले महान इंजीनियर्स कौन हैं? कुछ लोगों ने पुल की तस्वीरें शेयर कर इसे इंजीनियरिंग चमत्कार बताया। वहीं सोशल मीडिया पर फ्लाइओवर को लेकर कई सारे मीम्स भी बन रहे हैं। मीरा-भाईदर में बना फोर लेन का ब्रिज अचानक दो लेन में परिवर्तित हो जाता है, इसको लेकर एमएमआरडीए की काफी आलोचना की जा रही है। कई लोग पूछ रहे है कि मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ने ऐसे डिजाइन को कैसे मंजूरी दे दी, जो तेज गति से चलने वाले वाहनों के चार लेन को एक संकरे रास्ते में धकेल देता है। यह ऐसा डिजाइन है, जो शॉर्टकट दुर्घटनाओं को रोकने के बजाय उन्हें और बढ़ा सकती है। खास बात यह है कि यह पुल महत्वाकांक्षी मेट्रो लाइन ९ परियोजना का हिस्सा है और इसका उद्देश्य यातायात को सुगम बनाना है, लेकिन इसके बजाय यह ऑनलाइन हंसी का पात्र बन गया है।

# जनरल नरवणे यांच्या 'त्या' पुस्तकात नक्की काय आहे? लोकसभेतील गदारोळ कशासाठी?


संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान सोमवारी लोकसभेत मोठा गदारोळ पाहायला मिळाला. विरोधी पक्षनेते राहुल यांनी माजी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित आत्मचरित्राचा उल्लेख करताच संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी त्यावर तत्काळ आक्षेप घेतला. त्यांच्या मदतीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह व संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू देखील मैदानात उतरले. त्यामुळे सभागृहाचे कामकाज काही काळासाठी विस्कळीत झाले होते. यापार्श्वभूमीवर जनरल नरवणे यांचे पुस्तक नक्की कशावर आधारित आहे? गेल्या दोन वर्षांपासून त्याचे प्रकाशन का रखडले? संरक्षण दलातील अधिकाऱ्यांनी लिहिलेल्या पुस्तकांबाबत कोणते नियम लागू होतात? त्याविषयीचा हा आढावा

**जनरल नरवणे यांच्या पुस्तकात नक्की काय?**

जनरल नरवणे यांनी आत्मचरित्रात त्यांच्या ४० वर्षांच्या लष्करी सेवेचा अनुभव मांडला आहे. 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' असे या पुस्तकाचे नाव आहे. जानेवारी २०२४ मध्ये या पुस्तकाचे प्रकाशन होणार होते. मात्र, त्यातील दोन प्रमुख विषयांवरून मोठा राजकीय वाद निर्माण झाला. डिसेंबर २०२३ मध्ये पीटीआय वृत्तसंस्थेने त्यातील काही उतारे प्रसिद्ध केल्यानंतर भारतीय लष्कराने या पुस्तकाची तपासणी (रिव्ह्यू) सुरू केली. या उताऱ्यांमध्ये २०२० साली भारत व चीन यांच्यात निर्माण झालेल्या तणावाचा उल्लेख होता. त्यावेळी पूर्व लडाखमधील भागात चिनी रणगाडे भारतीय चौक्यांच्या अगदी जवळ आले होते. अत्यंत तणावाच्या क्षणी भारतीय राजकीय नेतृत्वाकडून (पंतप्रधान आणि संरक्षण मंत्री) स्पष्ट आदेश मिळण्यास विलंब झाला आणि शेवटी निर्णय घेण्याचा अधिकार लष्करावरच सोपवण्यात आल्याचे पुस्तकात नमूद आहे. त्याशिवाय २०२३ मध्ये लागू करण्यात आलेल्या 'अग्निपथ' भरती योजनेबाबत सशस्त्र दलांमध्ये झालेल्या चर्चांचा तपशीलही या पुस्तकात असल्याचे सांगितले जात आहे.

**पुस्तकाचे प्रकाशन कशामुळे रखडले?**

जनरल नरवणे यांचे चरित्र २०२४ मध्ये प्रकाशित होणार होते, परंतु गेल्या दोन वर्षांपासून त्याचे प्रकाशन रडखडले आहे. त्यामागचे कारण म्हणजे- लष्कर आणि संरक्षण मंत्रालयाकडून त्याची छाननी केली जात आहे. भारतीय संरक्षण दलाच्या नियमांनुसार, लष्करी अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना कोणत्याही स्वरुपात सेवेशी संबंधित बाबी प्रसारमाध्यमांना देण्यास मनाई आहे. तसेच, केंद्र सरकारची पूर्वपरवानगी न घेता अशा स्वरूपाचे पुस्तक किंवा कोणताही दस्तऐवज प्रकाशित करण्यासही बंदी आहे. त्याशिवाय सेवेत असलेले अधिकारी केंद्र सरकारच्या पूर्वसंमतीशिवाय राजकीय प्रश्नांशी संबंधित, सेवाविषयक बाबींवर किंवा लष्करी विषयांवर आपले मत मांडणारे व्याख्यान देऊ शकत नाहीत. नियमांनुसार, 'सेवा माहिती' आणि 'सेवाविषयक बाबी' या संज्ञांमध्ये सशस्त्र दल, संरक्षण व्यवस्था तसेच केंद्र सरकारचे परराष्ट्र संबंध यासंबंधीची माहिती व विषयांचा समावेश होतो. अधिकाऱ्यांच्या मते, सशस्त्र दलातील एखाद्या व्यक्तीने आपल्या सेवेशी संबंधित नसलेले साहित्यिक अथवा कलात्मक स्वरूपाचे पुस्तक लिहिलेले असल्यास त्यावर हे नियम लागू होत नाहीत.




**निवृत्त अधिकाऱ्यांनाही नियम लागू होतात का?**

निवृत्तीनंतरही अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यकाळात हाताळलेली संवेदनशील किंवा गोपनीय माहिती उघड करण्यास मनाई करण्यात आली आहे. मात्र, निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांनी पुस्तक प्रकाशित करताना कोणती प्रक्रिया पाळावी याचा कोणताही स्पष्ट उल्लेख नियमांमध्ये नाही. यापूर्वी दी इंडियन एक्सप्रेसशी बोलताना काही अधिकाऱ्यांनी सांगितले होते की, लष्करी अधिकाऱ्यांच्या पुस्तकांची छाननी करताना 'केंद्रीय नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९७२' मधील तरतुदींचा आधार घेतला जाऊ शकतो. जून २०२१ मध्ये 'कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने' या नियमांमध्ये महत्त्वाची सुधारणा केली होती. जरी सशस्त्र दल या नियमांच्या कक्षेत येत नसले, तरीही या दुरुस्त नियमांचा आधार घेण्यात जाऊ शकते, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. या दुरुस्तीनुसार गुप्तचर किंवा सुरक्षेशी संबंधित संस्थांमध्ये सेवा दिलेल्या निवृत्त सरकारी कर्मचाऱ्यांना संबंधित संस्थेशी निगडित केंद्र सरकारची पूर्वपरवानगी न घेता कोणतीही माहिती प्रकाशित करण्यास मनाई आहे. दुसरीकडे, या श्रेणीत न मोडणाऱ्या निवृत्त नागरी अधिकाऱ्यांना पुस्तक प्रकाशित करण्यासाठी सरकारची परवानगी आवश्यक नसते, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

**वादाचे नेमके मूळ काय?**

जनरल नरवणे यांनी त्यांच्या पुस्तकात लडाखमधील भारत-चीन यांच्यातील संघर्ष व 'अग्निपथ' योजना लागू करण्याआधी अधिकाऱ्यांमध्ये झालेल्या बैठकीतील मुद्दे नमदू केल्याचे सांगितले जात आहे. दोन्ही विषय 'राष्ट्रीय सुरक्षा' आणि 'परराष्ट्र संबंधांच्या' कक्षेत येत असल्यामुळे निवृत्त असूनही त्यांच्या पुस्तकातील मजकूर लष्कर व संरक्षण मंत्रालयाकडून तपासला जात आहे, जेणेकरून कोणतीही गोपनीय माहिती उघड होणार नाही. यापूर्वी अनेक लष्करी अधिकाऱ्यांनी निवृत्तीनंतर किंवा सेवेत असताना लष्करी विषयांवर पुस्तके लिहिली आहेत. जनरल नरवणे यांच्या पुस्तकावरून वाद निर्माण झाला असला तरीही लष्करी इतिहास व अनुभवांवर लेखन करण्याची ही परंपरा जुनी आहे.

**संरक्षण मंत्र्यांचा आक्षेप कशावर?**

राहुल गांधी यांनी नरवणे यांनी लिहिलेले पुस्तक सभागृहात सादर करावे, असे आव्हान संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी दिले. विरोधी पक्षनेते प्रकाशित न झालेल्या पुस्तकाचा संदर्भ देऊन देशाची दिशाभूल करत आहेत. त्यांनी केलेले आरोप बिनबुडाचे व काल्पनिक आहेत. त्यांनी सभागृहात त्याबाबत बोलू नये, स्पष्ट भूमिका राजनाथ सिंह यांनी घेतली होती. अमित शहा यांनीही राजनाथ यांच्या युक्तिवादात सूर मिळवला. मात्र, राहुल गांधींनी आपले म्हणणे न थांबवता मनोज नरवणेंच्या पुस्तकाचा संदर्भ देणे चालूच ठेवले. मोदी व राजनाथ दोघेही चीनच्या मुद्द्यावर चर्चा करण्यास घाबरत आहेत. त्यांना एवढी कशाची भीती वाटते. त्यांना घाबरण्याजोगे काही नसेल तर त्यांनी नरवणेंच्या पुस्तकातील मोदी व राजनाथ यांच्याबद्दल व्यक्त केलेले मत ऐकून घ्यायला काय हरकत आहे, अशी आक्रमक भूमिका राहुल गांधी यांनी घेतली होती.

# लोकसेवेचा ध्यास, माणुसकीचा श्वास आणि संघर्षातून उभा राहिलेला नेता : आ. सुरेश आण्णा धस

आजच्या काळात राजकारणाकडे अनेक जण सत्तेचा मार्ग, प्रतिष्ठा किंवा स्वार्थ साधण्याचे साधन म्हणून पाहतात. मात्र काही मोजक्या व्यक्ती अशा असतात ज्या राजकारणाला समाजसेवेचे प्रभावी माध्यम मानतात. आ. सुरेश आण्णा धस हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना त्यांनी नेहमीच सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवले आहे. म्हणूनच जनता त्यांच्याकडे केवळ आमदार म्हणून नाही, तर खऱ्या अर्थाने समाजसेवक म्हणून पाहते.

आ.सुरेश आण्णा धस यांचा जनतेशी असलेला संबंध औपचारिक नाही, तर तो पूर्णपणे माणुसकीवर आधारित आहे. गावातील शेतकऱ्यापासून ते शहरातील गरजू नागरिकांपर्यंत प्रत्येकाच्या अडचणी ते आपुलकीने ऐकून घेतात. कुणाला आजारपणासाठी मदत लागो, कुणाला शिक्षणासाठी आधार हवा असो किंवा एखाद्या कुटुंबावर अचानक संकट ओढवले असो आ.सुरेश आण्णा धस शक्य तितक्या लवकर मदतीसाठी पुढे येतात.



शेतकरी हा समाजाचा कणा आहे, ही ठाम जाणीव ठेवून आ. सुरेश आण्णा धस यांनी कायम शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष दिले आहे. पाणीटंचाई, वीजपुरवठा, पीकनुकसान, नुकसानभरपाई, कर्जाचा ताण अशा अनेक गंभीर समस्यांवर त्यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. केवळ आश्वासन देऊन थांबणे नव्हे, तर प्रत्यक्ष काम करून प्रश्न सोडवण्यावर त्यांचा भर असतो. त्यामुळे शेतकरी वर्गात आ. सुरेश आण्णा धस यांच्याबद्दल विशेष विश्वास निर्माण झाला आहे.

युवक आणि विद्यार्थ्यांबाबतही आ.सुरेश आण्णा धस यांची भूमिका कायम सकारात्मक आणि प्रेरणादायी राहिली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करणे, तरुणांना रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन देणे आणि समाजासाठी काहीतरी चांगले करण्याची प्रेरणा देणे हे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. त्यांच्या या प्रयत्नांमुळे अनेक तरुणांना योग्य दिशा मिळाली असून, अनेकांचे आयुष्य घडले आहे.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे आ.सुरेश आण्णा धस यांनी दिव्यांग व्यक्तींच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नासाठी घेतलेली ठाम भूमिका. दिव्यांगांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली संजय गांधी निराधार योजना अंतर्गत मिळणारे मानधन अपुरे असल्याचे लक्षात घेऊन, आ. सुरेश आण्णा धस यांनी विधानसभेत या योजनेत तीन हजार रुपये मानधन देण्यात यावे अशी ठोस मागणी मांडली होती. त्यांच्या या मागणीला यश आले आणि आज अनेक दिव्यांग व्यक्तींना दरमहा तीन हजार रुपये मानधन मिळत आहे. ही केवळ आर्थिक मदत नसून, दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने जगण्यासाठी दिलेला मोठा आधार आहे.

आ.सुरेश आण्णा धस यांचे कार्य कधीही प्रसिद्धीसाठी नसते. अनेक वेळा त्यांनी केलेली मदत कुठेही झळकत नाही, परंतु ज्यांना मदत मिळते त्यांच्या आयुष्यात मोठा फरक पडतो. सत्ता, पद किंवा नाव यापेक्षा माणुसकी, संवेदनशीलता आणि सेवा हेच त्यांच्या कार्याचे खरे उद्दिष्ट आहे.

म्हणूनच आज जनतेच्या नजरेत आ.सुरेश आण्णा धस केवळ आमदार नाहीत, तर आपल्या सुख-दुःखात धावून येणारा, आधार देणारा आपला माणूस आहेत. जनतेच्या विश्वासावर खरे उतरून, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय व मदत पोहोचवणारे आ. सुरेश आण्णा धस हे खऱ्या अर्थाने समाजसेवक आहेत.

आ.सुरेश आण्णा धस यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

आपण सदैव निरोगी राहा, दीर्घायुष्य लाभो आणि समाजातील गोरगरीब, शेतकरी, युवक व दिव्यांगांसाठी आपले लोकाभिमुख व माणुसकीचे कार्य असेच अखंड सुरू राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

**लेखक : जिलानी शेख**

# नगरपरिषद, पंचायत समिती दिव्यांग बांधवाचा ५% निधी मार्च अखेरपर्यंत वाटप होणार

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

दिव्यांग बांधवांचा ५% निधी पंचायत समिती, ग्रा.पं. व नगरपरिषद किल्ले धारूर यांच्या वतीने निधी वाटप करण्यासाठी तहसिलदार यांना प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने निवेदन सादर केले होते. दिव्यांग बांधवांचा निधी वाटप करण्यात यावा. अन्यथा २८ जानेवारी रोजी हनुमंत तोंडे यांचे अन्नत्याग उपोषण करण्यात येणार होते.

अधिक माहिती अशी कि किल्ले धारूर तालुक्यातील पंचायत समिती, ग्रा.पं.सर्व यांच्या वतीने ५% निधी मार्च अखेर पर्यंत देणार असल्याची माहिती पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी आज प्रहार चे हनुमंत तोंडे, विष्णू चोले, हातागळे, सोमनाथ वाघमारे, संतोष



ढवळे, सुनिल कागने, गीता मुंडे, सार्थक घुले, परमेश्वर बडे, अंकुश पाटोळे, भाऊसाहेब दराडे, रमेश सुरवसे, स्मिता चव्हान, वर्षा बडे, जनक पांचाळ, जालींदर नागरगोजे, सुभाष जाधव, वंसत चोपडे तसेच आदी कार्यकर्ते याच्यांसोबत दि.२७ जानेवारी रोजी झालेल्या बैठकिमध्ये सांगितले. तसेच नगर परिषद यांनी पत्र दिलेले आहे.

जर दिव्यांग बांधवाचा मार्च अखेर पर्यंत ५% निधी वाटप केला नाही तर पंचायत समिती समोर बेमुदत ढोल, हलकी बजाओ आंदोलन करण्यात येईल.

**-हनुमंत तोंडे**

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा अस्थिकलश ४ फेब्रुवारीला बीडमध्ये दर्शनासाठी

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांचा अस्थिकलश मंगळवार, दि. ४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत बीड येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा कार्यालयात नागरिकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी ४ वाजता गेवराई तालुक्यातील राक्षसभूवन शनीचे येथील गोदावरी नदी पात्रात अस्थिकलशाचे विधीपूर्वक विसर्जन करण्यात येणार आहे.



बीड शहरातील नागरिकांनी आपल्या दिवंगत लोकनेत्यास श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दि. ४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत छत्रपती कॅपिटल, मित्र नगर चौक, बीड येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा कार्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण तसेच बीड शहराध्यक्ष अमर नाईकवाडे, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी केले आहे.

# बीड नगरपालिकेत निजाम सरकार यांचा सत्कार



**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिका येथे आमचे नेते व ज्येष्ठ मार्गदर्शक निजाम सरकार (भैय्या साहेब) यांनी स्वच्छता वैद्यक व सार्वजनिक आरोग्य सभापती पदाचा पदभार स्वीकारल्याच्या निमित्ताने त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. शहराच्या स्वच्छता, आरोग्य व सार्वजनिक सुविधांच्या विकासासाठी निजाम सरकार यांचे योगदान महत्त्वाचे ठरणार असून त्यांच्या नेतृत्वाखाली बीड शहर अधिक स्वच्छ व आरोग्यदृष्ट्या सक्षम होईल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला. या प्रसंगी शेख शाकेर, रहेमत पठाण, फारुख शेख, इरफान शेख (बाबा भाई), जाणी मामू यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी निजाम सरकार यांच्या कार्याची प्रशंसा करत त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र प्रदेश कार्यालयात आदरणीय अजित दादांना श्रद्धांजली अर्पण

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना त्या सह पूर्ण महाराष्ट्राच्या जनतेला विश्वास बसणार नाही अशी दुःखद घटना घडली. सर्वांचे लाडके महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आदरणीय अजित दादा पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झाले. जेणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह सबंध महाराष्ट्रावर शोककळा पसरली.

आदरणीय दादांना अचानक रीत्या श्रद्धांजली वाहण्यासाठी पक्षाच्या मुंबई कार्यालयात यावे लागेल असा विचार ही कधी मनात आला नव्हता, एरवी जनतेच्या कामासाठी प्रदेश कार्यालयात येणारी मानस दादांना श्रद्धांजली वाहत आहेत हे मनाला जणू न पटणारे दृश्य प्रत्यक्षात डोळ्या समोर दिसत असताना मी स्तब्ध होतो. अगदी जड अंतःकरणाने आदरणीय दादांना मुंबई प्रदेश पक्ष कार्यालयात श्रद्धांजली अर्पण करताना दादांच्या कार्याचा आढावा




डोळ्यासमोर दिसत होता सकाळी पाच वाजता जनतेच्या कामासाठी जनतेत मिसळून काम करणारा असा लोक नेता पुन्हा महाराष्ट्रात होईल की नाही हा विचार वारंवार येत होता. दिवसातून तब्बल पंधरा सोळा तास दादांनी लोसेवेला वाहिली सकाळी पाच ते रात्री दहा पर्यंत दादांनी फक्त आणि फक्त लोकांच्या कमालाच प्राधान्य दिले यातून दादा महाराष्ट्रच्या कामाचे माणूस ठरले दादांसारखा नेता व्हायला पस्तीस वर्ष लागली होती. अचानक दादा आपल्यातून निघून गेलेत हे अजून ही मनाला न पटणारे आहे. राजकीय जीवनात काम करत असताना सर्वसामान्य जनतेसाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या अशा या महान नेत्यास भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अविनाश नाईकवाडे त्यांच्यासह पाटोदा येथील संतोष दादा जाधव आदी उपस्थित होते.

# जि.प.च्या प्रांगणात शंभुराजेंच्या पुर्णाकृती पुतळ्यांसह महापुरूषांच्या रखडलेल्या स्मारकासाठी शंभुप्रेमी आक्रमक : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषदेच्या नुतन प्रशासकीय इमारतीसमोर महापुरूषांचे पुतळे उभारल्याशिवाय स्थलांतर नाही, लोकार्पण सोहळा होऊ देणार नाही या शंभुप्रेमींच्या आक्रोशानंतर तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी दि.१९ मार्च २०२२ रोजी छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याचे भुमिपुजन करूनच लवकरच काम सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले. या घटनेला आता पुढील महिन्यात ४ वर्षे होत आहेत. अद्याप कामाचा पत्ता नसुन केवळ कागदी घोडे नाचवण्याचा प्रकार सुरू आहे.



जिल्हा परिषद प्रशासकीय इमारतीच्या आवारात छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरूषांचे अर्धाकृती पुतळे उभारण्याचे प्रस्तावित असुन यामध्ये लोकनेते स्व.अजितदादा पवार यांच्या स्मारकाचा समावेश करण्यात यावा या मागणीसाठी आज दि.०२ सोमवार रोजी शंभुप्रेमी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद कार्यालयाच्या प्रांगणात जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड विलास जाधव, कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग मोमीन सय्यद शकील अहेमद यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात राहुल वायकर, संजय गोडसे, जयदत्त थोटे, शेख युनुस, शेख मुबीन, सुदाम तांदळे, राजेंद्र आमटे, नितिन सोनावणे, राहुल कवठेकर, विजय लाटे वरद आदी सहभागी होते.

दिवंगत लोकनेते स्व.अजितदादा पवार यांचाही पुतळा उभारण्याची मागणी जिल्हा परिषदेच्या आवारात महापुरूषांसह दिवंगत लोकनेते शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे, सुंदरराव सोळंके व लोकनेते गोपीनाथराव मुंडे, दिवंगत लोकनेत्या केशरकाकु क्षीरसागर यांचे पुतळे उभारण्याचे प्रस्तावित असुन नुकतेच विमान अपघातात मृत्युमुखी पडलेले बीड जिल्ह्याचे विकास पुरूष लोकनेते स्व.अजितदादा पवार यांचाही पुतळा उभारण्यात यावा अशी मागणी आंदोलनकर्ते यांनी केली आहे.

**सन २०२३ मध्ये ६० लक्ष तर चालु आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ५० लक्ष रूपयांची तरतूद करूनही काम रखडलेल्या अवस्थेत ; निधी अखर्चित :- डॉ.गणेश ढवळे**

१६ जानेवारी २०२३ मध्ये जिल्हा परिषद कार्यालय आवारात केलेल्या लक्ष्यवेधी आंदोलनानंतर माहे फेब्रुवारी २०२३ च्या अर्थसंकल्पात ६० लक्ष रूपयांची तरतूद करण्यात आली होती. तर १४ मे २०२५ रोजी जिल्हा परिषद कार्यालयात केलेल्या धरणे आंदोलनानंतर चालु आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये जिल्हा परिषद उत्पन्नातुन ५० लक्ष रूपयांची तरतूद करण्यात आल्याचे लेखी पत्र मोमीन सय्यद शकील अहमद कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग क्रमांक १ जिल्हा परिषद बीड यांनी आंदोलनकर्त्यांना दिले होते मात्र काम रखडले असल्याने निधी अखर्चित राहिल्याचे दिसून येते ही अत्यंत गंभीर आणि वेदनादायी बाब असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

**मागणी आणि घोषणा करणारे सत्तेत**

महापुरुषांसह लोक नेत्यांच्या पुतळ्यांची मागणी करणारे आणि याबाबत घोषणा करणारे नेते आज एकत्र राज्याच्या सत्तेत आहेत. ता.१९ मार्च २०२२ रोजी तत्कालीन पालकमंत्री धनंजय मुंडे, मंत्री अब्दुल सत्तार, तत्कालीन उपाध्यक्ष आणि विद्यमान खासदार बजरंग सोनावणे हे प्रत्यक्ष तर तत्कालीन ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या ऑनलाईन उपस्थितीत जिल्हा परिषदेच्या नव्या इमारतीचे लोकार्पण आणि महापुरुषांच्या पुतळ्यांचे भुमिपुजनही पार पडले होते. तेव्हा सत्तेत असलेली मंडळी आत्ताही सत्तेत आहेत मात्र महापुरूषांच्या पुतळयांबाबत सरकारला अनास्था का? असा सवाल डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपस्थित केला आहे.



## आळवाई (ता. मिरज) येथे 'साप्ताहिक वर्तमान महाराष्ट्र' साप्ताहिकाचे प्रकाशन संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील नामांकित वृत्तपत्र असलेल्या 'साप्ताहिक वर्तमान महाराष्ट्र' या वृत्तपत्राचे भव्य प्रकाशन दि.२७ जानेवारी २०२६ रोजी आळवाई (तालुका मिरज, जिल्हा बिदर, कर्नाटक राज्य) येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या प्रकाशन सोहळ्यास सामाजिक, शैक्षणिक, राजकीय तसेच पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. उपस्थित मान्यवरांनी 'साप्ताहिक वर्तमान महाराष्ट्र' या वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्न, सर्वसामान्य जनतेचे प्रश्न, ग्रामीण भागातील समस्या तसेच सत्य व निर्भीड पत्रकारितेला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमादरम्यान वक्त्यांनी माध्यमांची समाजातील भूमिका अधोरेखित करताना, लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारितेचे महत्त्व स्पष्ट केले. 'साप्ताहिक वर्तमान महाराष्ट्र' हे वृत्तपत्र वाचकांपर्यंत सत्य, पारदर्शक व वस्तुनिष्ठ बातम्या पोहोचवेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त केला. उपस्थित नागरिकांनी या वृत्तपत्राच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या व या प्रकाशनामुळे महाराष्ट्रासह सीमाभागातील वाचकांना दर्जेदार पत्रकारितेचा लाभ होणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# पाटोद्यात मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेत व्यवस्थेचा फज्जा

### विद्यार्थ्यांना वरांड्यात जमिनीवर बसून परीक्षा देण्याची वेळ; पालकांचा संताप

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथे रविवारी दि.०१ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आलेल्या मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेदरम्यान आयोजकांच्या नियोजनातील गंभीर त्रुटी उघडकीस आल्या. परीक्षा केंद्र म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या प्रियदर्शनी कन्या प्रशाला, पाटोदा येथे विद्यार्थ्यांना बसण्यासाठी पुरेशी व्यवस्था नसल्याने परीक्षेच्या दिवशी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. परीक्षेसाठी आलेल्या अनेक विद्यार्थ्यांना वर्ग खोल्यांऐवजी शाळेच्या बाहेरील वरांड्यात बसवण्यात आले, काही विद्यार्थ्यांना डेस्कवर बसवले गेले तर काहींना थेट जमिनीवर बसून परीक्षा द्यावी लागली.




राज्यस्तरीय परीक्षा असूनही विद्यार्थ्यांना अशा परिस्थितीत परीक्षा द्यावी लागल्याने एकाग्रतेवर परिणाम झाल्याचे पालकांनी सांगितले.या प्रकारामुळे विद्यार्थ्यांसोबत आलेल्या पालकांनी तीव्र संताप व्यक्त केला. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य घडवणाऱ्या परीक्षांमध्ये किमान सुविधा पुरवणे ही आयोजकांची जबाबदारी असताना, ती पूर्ण करण्यात आयोजक अपयशी ठरल्याचा आरोप पालकांनी केला आहे.

लहान वयोगटातील विद्यार्थ्यांना असुविधाजनक परिस्थितीत बसवणे हे अमानवी असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. भविष्यात अशा परीक्षांचे आयोजन करताना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह बसण्याच्या सुविधांची योग्य व्यवस्था करावी या प्रकरणाची शिक्षण विभाग व परीक्षा आयोजकांनी चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# हजयात्रा २०२६ साठी जाणाऱ्या बीड जिल्ह्यातील सर्व यात्रीयांसाठी २,३,४ फेब्रुवारी रोजी मेडिकल स्क्रिनिंग आणि वॅक्सिनेशन कॅम्प

### हज २०२६ साठी जाणाऱ्या बीड जिल्ह्यातील सर्व हाजींनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा : हाजी बी. एस मोहसीन

**बीड । प्रतिनिधी**

हज कमिटी ऑफ इंडियन मुंबई तर्फे हज २०२६ साठी जाणाऱ्या बीड जिल्ह्यातील सर्व महिला व पुरुष यात्रियांसाठी तीन दिवसी २, ३, ४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ ते ५ वाजेपर्यंत मेडिकल स्क्रिनिंग व वॅक्सिनेशन कॅम्प बीड जिल्हा शासकीय रुग्णालयात आयोजित केलेला आहे. हे मेडिकल स्क्रिनिंग व वॅक्सिनेशन कॅम्प हज कमिटी ऑफ इंडिया मुंबई तर्फे येणाऱ्या हज ट्रेनर्स यांच्या मार्गदर्शनात होणार आहे.

सऊदी अरेबिया मध्ये दर वर्षी हज अदा करण्या साठी संपूर्ण जगा मधून ३० ते ४० लाख यात्री येतात. सऊदी अरेबिया येणाऱ्या यात्रियांसाठी संपूर्ण नियोजन करतात. या वर्षी सऊदी अरेबिया कडून येणाऱ्या यात्रियांसाठी नवीन निर्देश देण्यात आले की हज यात्रा साठी येणाऱ्या हजीना कोणत्याही प्रकारच्या गंभीर आजार नसावा. हाजी हेल्थी व पूर्ण पने फिट असावा. प्रत्येक हाजीना हज अदा करण्यासाठी दिनांक ८ जिल हिज्जा ते १२ जिल हिज्जा या ५ पांच दिवसात ३० ते ४० किलोमीटर पाय पाय चालावे लागतात. वेगवेगळ्या स्थानात वेगवेगळ्या आमाल कार्य करावा लागतो. या सर्व गोष्टी पाहून सौदी अरेबिया आणि हज कमिटी ऑफ इंडियन ने हज यात्रा साठी जाणाऱ्या यात्रायांची मेडिकल स्क्रिनिंग करण्याचे आदेश दिले आहे.



हे मेडिकल स्क्रिनिंग बीड जिल्हा शासकीय रुग्णालयातील डॉक्टर करणार आहे. मेडिकल स्क्रिनिंग आणि वॅक्सिनेशन कॅम्प मध्ये प्रत्येक हाजीला एक एक मेडिकल हेल्थ कार्ड दिला जाईल. मेडिकल हेल्थ कार्ड मध्ये हाजींची मेडिकल तपासणीची सर्व माहिती राहील, मेडिकल कार्ड हे हज यात्रा मध्ये सर्वात आवश्यक डोकोमेंट्स आहे. प्रत्येक हाजी नी आपला आपला हेल्थ कार्ड काळजी पुर्वक संभाळून ठेवावे.बीड जिल्हा शासकीय रुग्णालयांच्या आरोग्य विभागा कडून हज २०२६ साठी जाणाऱ्या यात्रियानं साठी मेडिकल स्क्रिनिंग व वॅक्सिनेशन कॅम्प ची संपूर्ण तयारी करण्यात आली आहे.

हज २०२६ साठी जाणाऱ्या बीड जिल्ह्यातील सर्व यात्री साठी हज कमिटी ऑफ इंडिया ने मेडिकल स्क्रिनिंग अँड वेक्सिनेशन कॉम्प्लेसरी केलेला आहे. या मेडिकल स्क्रिनिंग कॅम्प मध्ये सर्व हजीयांची मेडिकल तपासणी होणार आहे. मेडिकल कॅम्प मध्ये येणाऱ्या सर्व हाजीयानी आपल्या सोबत १. आधार कार, २. दोन पासपोर्ट साइज फ़ोटो, ३. पासपोर्टची ज़ेरॉक्स कॉपी, ३. एप्लीकेशन फॉर्म सोबत दिलेल्या मेडिकल स्क्रिनिंग सर्टिफिकेट, ४. आपल्या जुन्या मेडिकल रिपोर्ट्स, ५. कोविड १९ वॅक्सिनेशन सर्टिफिकेट सोबत आणावे.

मागील तीन वर्षा पासून बीड जिल्हा खादीम उल हुज्जाज कमिटी हज यात्रा साठी जाणाऱ्या यात्रियानं, हाजी साठी वेगवेगळ्या उपक्रम करत आहे. सोशल मीडिया, व्हॉट्स ऍप च्या माध्यमातून हाजीयांचा मार्गदर्शन करणे, हाजींना येणाऱ्या वेगवेगळ्या समस्या सोडवणे, हज कमिटी ऑफ इंडिया कडून येणाऱ्या सर्व माहिती देणे. मागील एक महिन्या पासून हज यात्रेच्या विषय वर पुरुष व महिला यात्रियांची दररोज मार्गदर्शन शिबिर सुरू आहे. त्या मार्गदर्शन शिबिर मध्ये मेडिकल स्क्रिनिंग व वॅक्सिनेशन कॅम्प ची सर्व माहिती बीड जिल्हा खादीम उल हुज्जाज कमिटीच्या अध्यक्ष हाजी बी. एस मोहसीन यांनी यात्रियांना, हाजींना दिली आहे.

हज २०२६ साठी जाणाऱ्या सर्व यात्रियांनी, हाजींनी मेडिकल स्क्रिनिंग व वॅक्सिनेशन कॅम्प चा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. मेडिकल स्क्रिनिंग व वॅक्सिनेशन कॅम्प ची अधिक माहितीसाठी बीड जिल्हा खादीम उल हुज्जाज कमिटीच्या अध्यक्ष हाजी बी.एस. मोहसीन यांच्याशी संपर्क साधावा. ९२७२४२७३९३ असे आवाहन कमेटीचे अध्यक्ष हाजी बी.एस मोहसीन यांनी केले आहे.

## बीड रेल्वे स्थानकाला माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांचे नाव देण्यात यावे : काझी मुहीबूर रहमान

**बीड । प्रतिनिधी**

बीड रेल्वे स्थानकाला महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते अजित पवार यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी बीड जिल्ह्यातील आणी बीड शहरातील लोक करत आहे अजित पवार यांनी राज्याच्या विकासासाठी तसेच मराठवाड्यातील पायाभूत सुविधांसाठी दिलेल्या योगदानाची दखल घेऊन हा निर्णय घ्यावा, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.



बीड जिल्ह्याच्या विकासासाठी अजित पवार यांनी केलेल्या कामामुळे नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल विशेष आदर असल्याचे सांगण्यात आले. रेल्वे स्थानकाला त्यांचे नाव दिल्यास जिल्ह्याची ओळख अधिक व्यापक पातळीवर निर्माण होईल, असा विश्वास मागणी करणाऱ्यांनी व्यक्त केला. या संदर्भात संबंधित मागणीचे निवेदन रेल्वे प्रशासन व राज्य सरकारकडे लवकरच सादर करण्यात येणार असल्याची माहिती मागणी करणाऱ्यांनी दिली.

## कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांची बदली रद्द करा : मोरे, धायजे, शेख

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष, निर्भीड व लोकाभिमुख पोलीस निरीक्षक श्री. राहुल सुर्यतळ यांची बदली झाल्याने माजलगाव शहरात नागरिक, व्यापारी व विविध सामाजिक संघटनांतून दुःख व्यक्त करण्यात येत आहे. आपल्या कार्यकाळात पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांनी कायदा-सुव्यवस्था सक्षमपणे राखत गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवले. सामान्य नागरिकांशी आपुलकीने संवाद साधत त्यांनी पोलीस-नागरिक नातेसंबंध अधिक दृढ केले. महिलांच्या सुरक्षिततेसाठी, वाहतूक शिस्त, तसेच अवैध धंद्यांविरोधात त्यांनी कणखर भूमिका घेतली होती. त्यांच्या कार्यशैलीमुळे माजलगाव शहरात शांतता व सुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. दबावाला न झुकता, प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्याची बदली ही माजलगावकरांसाठी खंतजनक असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. विविध सामाजिक व नागरिक संघटनांनी पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. चांगल्या व कर्तव्यदक्ष आधिकार्याची बदली रद्द करावी अशी मागणी बहुजन विकास मोर्चा च्या वतिने होत आहे यात श्रिहरी मोरे नाना नवनाथ (अण्णा) धायजे व शेख बाबा व शेख फेरोज हे वरिष्ठ आधिकारी यांच्या समोर हि मागणी मांडणार आहेत.



महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मां. ना. बाबासाहेब पाटील यांचे बीड येथे आगमन झाल्यानंतर यांच्या सत्कार करताना शिवसंग्राम चे शहराध्यक्ष सुहास पाटील साहेब राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण काकडे, बीड जिल्हा उपनिबंधक तोटावार साहेब इत्यादी.

## माजलगावात १ फेब्रुवारीला सर्वपक्षीय शोक सभेचे आयोजन

### सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे : आ.प्रकाशदादा सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आपघाती निधन झाले असुन त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी माजलगाव दि.१ फेब्रुवारी रोजी सर्वपक्षीय शोक सभेचे आयोजन करण्यात आले असुन या शोक सभेला उपस्थित रहावे असे आवाहन माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या वतीने करण्यात आले आहे.



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामती येथे विमान आपघातात निधन झाले. त्यांच्या निधनाने राज्यभर शोककळा पसरली असून शासनाच्या वतीने तिन दिवसांचा दुःखवटा जाहिर करण्यात आलेला आहे तर माजलगावातील सर्वपक्षीय दि.१ फेब्रुवरीला माजलगाव येथे सर्व राजकीय पक्ष, संघटनांच्या वतीने अजितदादा यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सर्वश्रीय शोक सभेचे नियोजन करण्यात आले असून या सभेला सर्व पक्षीय पक्षाधिकारी, कार्यकर्ते, मोठ्या संघटनेचे पक्षाधिकारी यांनी उपस्थित राहावे असे आव्हान माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या वतीने करण्यात आले.

## एस.एम.युसूफ यांची मुक्त पत्रकारिता अभिमानास्पद : रमेशराव गंगाधरे

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ हे बीड जिल्ह्यातील स्थानिक आणि विभागीय वृत्तपत्रात गेल्या १२ वर्षांपासून (एक तप) सातत्याने मुक्त पत्रकारिता करत आहेत. त्यांची पत्रकारिता अभिमानास्पद आहे. असे गौरवोद्गार त्यांचे हृदयी सत्कार करताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनी काढले.




यापुढे बोलताना गंगाधरे यांनी म्हटले की, एस.एम.युसूफ़ यांनी नुकतेच ३० डिसेंबर रोजी पत्रकारिता क्षेत्रात एक परखड, सडेतोड, सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेला हाडाचा खंबीर पत्रकार म्हणून १२ वर्षे (एक तप) पूर्ण केले आहे. पत्रकारिता क्षेत्रात एक तपापासून लिखाण करणारे एस.एम.युसूफ़ कोणत्याही स्थानिक किंवा विभागीय वृत्तपत्राकडून एक रुपयाचं मानधन न घेता आणि समाजाकडून ही कोणतीही अपेक्षा न ठेवता सातत्याने समाजातील समस्या व प्रश्नांवर लिखाण करतात. स्थानिक पातळीवरील समस्या व प्रश्न असो की, जिल्हा पातळीवरील असो ते आपल्या लेखणी द्वारे या समस्या व प्रश्नांची उकल सविस्तरपणे आपल्या बातम्या व लेखांच्या माध्यमातून वृत्तपत्रातून करतात. त्यांनी आतापर्यंत असेही अनेक विषय मांडले आहेत जे राज्य किंवा देश पातळीशी निगडीत होते. त्यासाठी फक्त वृत्तपत्रातून बातमी देण्यापुरते ते लक्ष वेधत नाहीत तर उचललेले प्रश्न धसास लावण्यासाठी अनेकदा संबंधित शासन-प्रशासनाला निवेदनेही देतात. ज्यामुळे समस्या व प्रश्नांना वाचा फुटते असेही म्हटले. यावेळी जलील मोमीन, श्यामराव तुपे, ड. सय्यद सरफराज़, शेख लईख़ यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.

## गटसचिव श्रीधरराव अंडील यांचा सेवापूर्ती सोहळा अश्रूंनी ओलावलेला; तीन दशकांचा प्रदीर्घ प्रवास

**धारूर । प्रतिनिधी**

दररोज वेळेवर कार्यालयात हजर राहणं, नोंदवही सांभाळणं, लोकांच्या अडचणी ऐकणं आणि त्या सोडवण्यासाठी मनापासून प्रयत्न करणं - हे सगळं आयुष्यभर न थकता करणारा एक शांत, संयमी आणि माणुसकी जपणारा सेवक आज सेवेतून निवृत्त झाला. धारूर तालुक्यातील सेवा सहकारी संस्था मर्यादित तांदळवाडी व धुनकवाड येथील ज्येष्ठ गटसचिव मा. श्रीधरराव ज्ञानोबा अंडील हे शनिवार, दि. ३१/०१/२०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.

डिसेंबर १९९५ पासून सुरू झालेला हा प्रवास केवळ नोकरीचा नव्हता, तर तो जबाबदारी, निष्ठा आणि माणुसकीचा होता. तीस वर्षांच्या सेवेत त्यांनी कधीही पद, प्रतिष्ठा किंवा स्वार्थाला महत्त्व न देता संस्थेचे हित, सहकाऱ्यांचा सन्मान आणि सामान्य माणसाचा विश्वास जपला.



अत्यंत मितभाषी, शांत स्वभावाचे श्रीधरराव अंडील कधीच मोठ्या शब्दांत बोलले नाहीत; पण त्यांच्या कामाने, वागणुकीने आणि संवेदनशीलतेने असंख्य माणसांची मनं जिंकली. कोणालाही अडचण असली की कसं जमेल ते बघू हे त्यांचे शब्द आजही अनेकांच्या कानात घुमत आहेत.

सर्व सचिवांना कुटुंबासारखं जपणं, सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन चालणं आणि कामात शिस्त ठेवणं हे त्यांच्या स्वभावाचं वैशिष्ट्य होतं. संस्थेच्या नोंदी, कागदपत्रं, व्यवहार - सगळं त्यांच्या हातून इतकं नीटस, प्रामाणिकपणे झालं की त्यांच्या नावासोबत 'विश्वास' हा शब्द कायम जोडला गेला.

धारूर तालुका देखरेख सहकारी संस्थेत सहाय्यक सचिव म्हणून काम करताना त्यांनी प्रेमाने, समजून आणि संयमाने काम करून घेतलं. तालुका सहकार क्षेत्रात कायम अग्रेसर राहावा, हीच त्यांची एकमेव इच्छा होती - आणि ती त्यांनी कृतीतून दाखवली. आज त्यांच्या सेवापूर्तीच्या निमित्ताने बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा, धारूर व धारूर तालुका गटसचिव संघटनेच्या वतीने झालेला गौरव सोहळा म्हणजे एका कर्तव्यनिष्ठ सेवकाला दिलेला भावपूर्ण निरोप होता. सत्काराच्या वेळी अनेक सहकारी, मित्र आणि शुभेच्छुकांचे डोळे पाणावले होते. शब्द थांबत होते भावना मात्र वाहत होत्या. सेवेतून निवृत्त झाले असले तरी श्रीधरराव अंडील यांनी रुजवलेली माणुसकी, प्रामाणिकपणा आणि सहकाराची मूल्यं कधीच निवृत्त होणार नाहीत.

साप्ताहिक **विश्वनायक**

**बीड जिल्हा**

मंगळवार दि. ०३ फेब्रुवारी २०२६



## वाराणसीतील मणिकर्णिका घाटाची तोडफोड करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचा ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा नामशेष करण्याचा प्रयत्नांच्या निषेधार्थ

# लिंबागणेश येथे रास्ता रोको आंदोलन

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

उत्तरप्रदेशातील वाराणसी येथील जगप्रसिद्ध मणिकर्णिका घाटावर सुरू असलेल्या पुनर्विकास कामाच्या नावाखाली ऐतिहासिक मूर्ती व शिवलिंगांची तोडफोड करण्यात आल्याचे प्रकार सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून समोर आले आहेत. संपूर्ण भारतात सांस्कृतिक पुनरुत्थानाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी उभारलेल्या ऐतिहासिक संरचनांचे झालेले नुकसान हा केवळ बांधकामाचा प्रश्न नसून तो धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशावर झालेला घाला असल्याचे मत व्यक्त होत आहे.

या घटनेच्या निषेधार्थ मंगळवार (दि.२७) रोजी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौक, लिंबागणेश येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. रविंद्र निर्मळ, कृष्णा पितळे यांची समयोचित भाषणे झाली. निवेदन मंडळ अधिकारी उज्ज्वला राऊत, तलाठी गणपत पोतदार, सहाय्यक फौजदार विठ्ठल राठोड, पोह.अविनाश घुंगरट, पोह. गणेश परजने यांनी स्विकारले. यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ आप्पा गिरे, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, अॅड. गणेश वाणी, दामोदर थोरात, समीर शेख, औदुंबर नाईकवाडे,अनंतकाका मुळे, गणपत घोलप, बाळकृष्ण थोरात, कृष्णा पितळे, अमोल पितळे, संदिप मुळे, शहादेव धलपे, रामचंद्र मुळे, रामचंद्र गिरे, हिरामण मुळे, विशाल तागड, ऋषिकेश तागड, गणेश तागड, दत्ता गिरे, बंकट लगास, सुनिल मुळे, हनुमान वैद्य, प्रकाश मुळे, सुखदेव वाणी, दादाराव येडे, बबन गोंडे, दशरथ दाभाडे, दत्ता मुळे, जयदेव गिरे,



अशोक तागड, बंडु ढगारे, कल्याण मुळे, अमोल गिरे, सचिन गिरे, बबन गिरे, अर्जुन पितळे, चक्रधर गिरे, महादेव मुळे, सुदाम मुळे, राजेभाऊ गिरे, बाळु सोनावणे आदी सहभागी होते.

निवेदनाद्वारे ठाम मागण्या या आंदोलनादरम्यान जिल्हाधिकारी बीड व पोलीस अधीक्षक बीड यांच्यामार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान भारत सरकार, राज्यपाल तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, दोषी अधिकारी व संबंधित एजन्सींवर कठोर कारवाई करावी, तोडफोडीत नुकसान झालेल्या मूर्ती ढिगाऱ्यातून तात्काळ बाहेर काढून अहिल्यादेवी होळकर चॅरिटीज ट्रस्टकडे सुपूर्द कराव्यात, ट्रस्टच्या समन्वयाने मूर्तींची पुनर्स्थापना करण्यात यावी, अशा ठाम मागण्या करण्यात आल्या.

**शांततेत पण ठाम आंदोलन**

या रास्ता रोको आंदोलनात विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, ग्रामस्थ, भाविक नागरिक तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या वारशाबाबत आस्था असलेले नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हे आंदोलन पूर्णतः शांततेच्या मार्गाने पार पडले.

**ऐतिहासिक वारशावर घाला**

सुमारे अडीचशे वर्षांपूर्वी उभारण्यात आलेल्या या ऐतिहासिक घाटाचे स्मशानघाट विकास प्रकल्पांतर्गत नुकसान झाल्यानंतर काशीपासून इंदूरपर्यंतच नव्हे तर संपूर्ण देशभर संतापाची लाट उसळली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी काशीच्या ८४ घाटांपैकी मणिकर्णिका घाटाचे बांधकाम सन १७७१ मध्ये केले होते. या घाटाशी संबंधित अनेक ऐतिहासिक मूर्ती व धार्मिक प्रतीके या तोडफोडीत खराब झाली असून काही मूर्ती ढिगाऱ्याखाली दबल्या, तर काही उघड्यावर पडलेल्या अवस्थेत आढळून आल्या आहेत. ज्या ठिकाणी ही तोडफोड झाली, तेथे अहिल्यादेवी होळकर यांच्या शिवआराधनेशी संबंधित प्रतिमा स्थापित होत्या. मणिकर्णिका घाटाची देखभाल अहिल्यादेवी होळकर चॅरिटीज ट्रस्ट कडून केली जाते. ट्रस्टचे अध्यक्ष यशवंतराव होळकर यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता करण्यात आलेल्या या कारवाईवर तीव्र आक्षेप नोंदवला आहे. दरम्यान, इंदूरच्या होळकर राजघराण्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी व उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याकडे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची व नुकसान झालेल्या मूर्तींची पुनर्स्थापना करण्याची मागणी केली आहे. मणिकर्णिका घाटावर अंत्यसंस्कार केल्यास मोक्षप्राप्ती होते, अशी धार्मिक मान्यता असून यात्रेकरूंसाठी धर्मशाळा, मंदिरे, अन्नछत्रे व स्नानगृहे उभारून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी काशीच्या सांस्कृतिक वैभवात मोलाची भर घातली होती.

## जिल्हा परिषद शाळांच्या स्वच्छतेसाठी सीईओ जितिन रहेमान यांचे कठोर निर्देश

### जिल्हा परिषद कार्यालयातील शौचालय स्वच्छता गांधीगिरी आंदोलनास यश

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषद अंतर्गत दि.१९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२५ दरम्यान राबविण्यात आलेली हमारा शौचालय, हमारा भविष्य ही मोहीम केवळ कागदोपत्रीच राबविण्यात आल्याच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी सहकाऱ्यांसह गांधीगिरी आंदोलन केले. दि.१५ डिसेंबर २०२५ रोजी ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाड्यांमध्ये अनेक ठिकाणी शौचालयांचा अभाव असून, काही ठिकाणी उपलब्ध शौचालये वापरण्यायोग्य नसल्याने विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांची शारीरिक व मानसिक कुचंबणा होत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.

या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद मुख्य इमारतीतील सीईओ यांच्या केबिनसमोरील पुरुष शौचालयाची स्वच्छता करून गांधीगिरी पद्धतीने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाची दखल घेत सीईओ



जितिन रहेमान यांनी जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या सर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये स्वच्छतेबाबत कठोर अंमलबजावणीचे निर्देश दिले आहेत. संबंधित विभागाकडून सर्व गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समित्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या असून, स्वच्छतेबाबत कोणतीही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा इशाराही देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या सवयी रुजवणे, आजारांचा प्रसार रोखणे व आरोग्यदायी शालेय वातावरण निर्माण करणे या उद्देशाने शाळा परिसर, वर्गखोल्या, स्वच्छतागृहे व पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेवर विशेष भर देण्यात येणार आहे. तसेच शाळांची नियमित तपासणी केली जाणार असून, दुर्लक्ष आढळल्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. या निर्णयाबाबत डॉ. गणेश ढवळे यांनी समाधान व्यक्त करत प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेचे स्वागत केले आहे.

## महाराष्ट्र सरकारला शपथविधीची एवढी घाई का? : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**



महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धडाकेबाज नेता म्हणजे अजित दादा पवार... त्यांचा जन्म २२ जुलै १९५९ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथे झाला. आणि १९८२ साली स्थानिक राजकारणातून त्यांची सुरुवात झाली. व १९९१ साली बारामती लोकसभा मतदारसंघातून पहिल्यांदा च संसदेत त्यांनी पहिले पाऊल ठेवले. नंतर १९९५ पासून ते सलग आठ वेळा धिनसभा निवडणुकीत विक्रमी मताधिकार्याने विजयी राहिले. १९९२ ते १९९३ या वर्षात जलसंधारण, ऊर्जा आणि नियोजन खात्याचे राज्यमंत्री राहिले. २०१० साली पहिल्यांदा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली. नंतर पण ते सात वेळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री झाले. प्रशासनावरील पकड आणि कामाचा धडाका ही दादांची ओळख होती. ते शेतकरी मजूर आणि मध्यवर्गीय यांच्या समस्यावर काम करणारे नेते होते. ते महाराष्ट्राच्या जनतेच्या गळ्यातले तावीज होते परंतु नियतीला मनात वेगळंच होतं आणि २९ जानेवारी २०२६ रोजी विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. हा अपघात आहे की घातपात ही लोकांच्या मनात शंका आहे. आणि दादाला जाऊन तीन दिवस सुद्धा झालेले नाही त्यांची राख सुद्धा थंडावली नाही आणि बैठका सुरू झाल्या महाराष्ट्राचं राजकारण हे एवढं गलिच्छ झालं. दादा आपण बरोबर सांगत होतात की राजकारण हे खूप गलिच्छ आहे राजकारणात जाऊ नका उद्योग पाणी बघा हे आज सिद्ध झालं.की त्यांचा दहावा सुद्धा होऊ देत नाही. पण लोकांच्या मनात एकच शंका आहे ती म्हणजे दादाचा घात झालेला आहे. आणि याची चौकशी झालीच पाहिजे. पण सरकारला उपमुख्यमंत्री पदाची एवढी घाई का?हा प्रश्न सामान्य जनतेच्या मनात पडलेला आहे. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते. देवा माझ्या सारखे लाख नेले तरी चाललं असतं, पण आमचा लाखाचा पोशिंदा दादा तू का असं घेऊन गेलास.

माजलगाव न.प. नामांतरण व गुंठेवारी लिपीकाचा भ्रष्टाचार तसेच माजलगाव तहसील अंतर्गत पुरवठा विभागाच्या निलंबित स्वस्त धान्य दुकानाच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी या मागणी करिता नवीद सिद्दिकी यांचे बीड जिल्हाधिकारी कार्यालय समोर उपोषण सुरू

## आज प्रजासत्ताक दिनी उपोषणाचा दुसरा दिवस



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव नगरपरिषद नामांतरण व गुंठेवारी विभागाचा भ्रष्टाचार तसेच माजलगाव तहसील पुरवठा विभागा अंतर्गत निलंबित झालेले स्वस्त धान्य राशन दुकानाच्या भ्रष्टाचार संदर्भात बीड जिल्हाधिकारी कार्यालय समोर महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने दि. २५ व २६ जानेवारी दोन दिवस उपोषण करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार सेना संघटनेचे माजलगाव तालुका अध्यक्ष नवीदोद्दीन मुस्ताक सिद्दिकी यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, माजलगाव नगर परिषदेत नामांतरण, गुंठेवारी विभाग अंतर्गत अनेक प्रकारचे भ्रष्टाचार होत असून बोगस गुंठेवारी बोगस नामांतरण खरेदी खत तयार केली जात आहे. मुख्याधिकारी यांच्या बोगस (डुप्लिकेट) सहीने एकाच पावतीवर अनेक गुंठेवारी बोगस नकाशे अशा बऱ्याचशा मोठ मोठया प्रमाणात विविध घोटाळे व भ्रष्टाचार माजलगाव नगरपरिषदेतील लिपिक व संबंधितांनी मिली भगत करून शासनाचे लाखो करोडो रुपये निळंकृत केले आहेत. इतकेच नाही तर यांच्या गुंडाराज विरोधा मध्ये कोणी निवेदन दिले व आंदोलन केले तर त्यांना धमकावत खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देतात तसेच लोकांमार्फत दमदाटी करतात. तरी मा.जिल्हाधिकारी साहेब यांनी स्वतः लक्ष देऊन या भ्रष्टाचार नगरपरिषद लिपिक व संबंधितांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर योग्य ते कायदेशीर गुन्हे दाखल करावे.

तसेच माजलगाव तहसील अंतर्गत पुरवठा विभागाचे निलंबित व सस्पेंड झालेले स्वस्त धान्य राशन दुकानाची चौकशी करून सर्वसामान्य गोरगरीब गरजू नागरिकांना न्याय मिळवून देऊन दारिद्र्यरेषेखालचे अत्यंत बिकट परिस्थितीच्या गरजू नागरिकांना न्याय मिळवून देऊन दारिद्र्यरेषेखालील गरजु लोकांना शासनाचा आलेला स्वस्त धान्य कोठा उपलब्ध करून द्यावा तसेच पीएचएच मध्ये डाटा एन्ट्री करून बारा अंकी आरसी नंबर उपलब्ध करून द्यावी या मागणी करिता सर्वसामान्य गोरगरीब जनतेच्या मागण्यांची दखल घेत महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार सेना संघटनेचे दि. २५ व २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी उपोषण सुरू असून माजलगाव तहसील अंतर्गत पुरवठा विभागाचे सस्पेंड निलंबित स्वस्त धान्य दुकानाची चौकशी करून शासनाला धोका देत भ्रष्टाचार करत गोरगरिबाच्या राशनवर डल्ला मारणाऱ्या संबंधितावर कठोर कारवाई करून सर्वसामान्य नागरिकांना न्याय द्यावा, अशी मागणी संघटनेचे माजलगाव तालुका अध्यक्ष नवीदोद्दिन मुस्ताक सिद्दिकी व त्यांच्या शिष्टमंडळाने बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण चालू असून आज उपोषणाचा दुसरा दिवस आहे.

## पाटोदा-मांजरसुंबा महामार्गावर अपघातांची साखळी कायम

### जाधववस्ती जवळ ट्रक-दुचाकीचा भीषण अपघात; संतोष कागदे यांचा जागीच मृत्यू

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गावरील मांजरसुंबा ते पाटोदा महामार्गावर अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसून आज दि.२८ बुधवार रोजी सायंकाळी सव्वा ७ वाजता जाधववस्ती परिसरात ट्रक व दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या अपघातात संतोष मधुकर कागदे वय ४२ वर्षे (रा. मोरगाव, ता. व जि. बीड)



यांचा मृत्यू झाला. ते दुचाकीवरून प्रवास करत असताना हा अपघात झाला.

मिळालेल्या माहितीनुसार ट्रक क्रमांक एम एच १२ एच डी १५१४ आणि दुचाकी क्रमांक एम एच १२ ए एल ८५६१ यांच्यात जोरदार धडक झाली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार धडक अत्यंत भीषण होती. अपघातात संतोष कागदे यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच नेकनूर पोलीस प्रशासनास कळविण्यात आले. त्यानंतर लिंबागणेश पोलीस चौकीचे पोह. मन्सूर शेख, पोशि. बाबासाहेब खाडे व पोशि. अब्दुल सय्यद हे अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलीस व रुग्णवाहिकेच्या मदतीने मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी बीड जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला असून पुढील तपास पोलीस प्रशासनाकडून सुरू आहे. दरम्यान, या महामार्गावर वारंवार अपघात होत असल्याने नागरिकांमध्ये भीती व चिंतेचे वातावरण आहे. प्रशासनाने या मार्गावर वाहतूक सुरक्षेसाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालक व ग्रामस्थांकडून होत आहे.

### सामाजिक न्याय भवनात प्रजासत्ताक दिन दिमाखात साजरा

## लाखो रुपयांचे बोअर, पाण्याची टाकी असूनही स्वच्छतेचा बोजवारा!

**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय भवनात प्रजासत्ताक दिन दिमाखात साजरा केला जातो. मात्र लाखो रुपयांचे बोअर, पाण्याची टाकी असूनही स्वच्छतेचा मात्र बोजवारा उडविला जातो असे उद्विग्न मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी मांडले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, शहरातील शासकीय सामाजिक न्याय भवनात २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला मात्र याच इमारतीमध्ये असलेल्या स्वच्छतागृहात स्वच्छतेचा बोजवारा उडाल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे या इमारतीत असलेल्या विविध कार्यालयात कर्तव्यरत असलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांसह येथे आलेल्या अभ्यागताना टॉयलेट, बाथरूम व मुतारीची सोय व्हावी म्हणून ते सुद्धा येथे बांधलेले आहे. एवढेच नाही तर त्यांचा वापर करताना पाण्याची कमतरता भासू नये म्हणून लाखो रुपये खर्च करून या कार्यालयाच्या आवारात बोअर ही घेतलेले आहे. हजारो लिटर पाणी सामावून घेणाऱ्या टाक्या सुद्धा इमारतीवर आणून ठेवलेल्या आहेत. त्यात बोअर मधून कनेक्शन घेतलेले आहे. यासाठी विद्युत कनेक्शन ही कार्यान्वित करण्यात आलेले आहे. तरीही गेल्या अनेक महिन्यांपासून ना बोअर चालू केले जाते, ना



इमारतीवरील पाण्याच्या टाक्या भरल्या जातात म्हणून टॉयलेट, बाथरूम व मुतारी मध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून पाण्याचा थेंब नसल्याचे दिसून आले आहे. यामुळे अनायासे या वास्तूंचा उपयोग करणाऱ्यांना पाणी मिळत नसल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात घाण आणि अस्वच्छता झालेली आहे.

स्वच्छतेचा अक्षरशः बोजवारा उडालेला आहे. तरीही या इमारतीमध्ये असलेल्या विविध कार्यालयातील अधिकाऱ्यांचे याकडे अक्षम्य असे दुर्लक्ष असल्याचे दिसून आले आहे. तर दुसरीकडे मात्र याच कार्यालयातील अधिकाऱ्यांनी नुकतेच २६ जानेवारी रोजी याच कार्यालयाच्या आवारात मोठ्या दिमाखात भारताचा तिरंगा झेंडा फडकवून प्रजासत्ताक दिन साजरा केला. यामुळे सामाजिक न्याय भवनात प्रजासत्ताक दिन दिमाखात साजरा केला जातो. मात्र लाखो रुपयांचे बोअर व पाण्याची टाकी असूनही स्वच्छतेचा मात्र बोजवारा उडविला जातो असे दिसून आले असे उद्विग्न मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी मांडले आहे.

## बीडच्या विकासाला गती देणाऱ्या लोकनेते अजितदादांना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन कट्यावर आंदोलनकर्त्यांकडून भावपूर्ण श्रद्धांजली

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्व. अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झाले. पालकमंत्री म्हणून बीड जिल्ह्याशी त्यांचे अतूट नाते निर्माण झाले होते. बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या मनात त्यांनी विकासाची नवी आशा जागवली होती.

पालकमंत्री म्हणून त्यांच्या कार्यकाळात बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी रेल्वे, विमानतळ, ट्रिपल आयटी (खखख-ढ), सहकार भवन, जिल्हा क्रीडा संकुल, सिल्क पार्क, रुग्णालयांसाठी नवीन इमारती व अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे, जिल्हा परिषदेच्या शाळा दुरुस्ती व बांधकाम, अंगणवाड्यांसाठी निधी, स्मशानभूमी विकास, ग्रामीण रस्त्यांचे मजबुतीकरण व दुरुस्ती, नर्सिंग कॉलेज, वसतिगृहे, फसवणूक झालेल्या ठेवीदारांसाठी मदत,



कंकालेश्वर मंदिर, नाट्यगृह आदींसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला होता.

त्यांच्या या विकासकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत आज दि.३० (शुक्रवार) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनस्थळी आंदोलनकर्ते, माहिती अधिकार कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणप्रेमी आणि अजितदादांवर प्रेम करणाऱ्या बीडकरांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर), माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, रामनाथ खोड, बाळासाहेब मोरे पाटील (प्रदेशाध्यक्ष - शिवशक्ती भीमशक्ती विचारमंच), माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष - आम आदमी पार्टी), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष - इंटक), सय्यद सादेक (शहराध्यक्ष - आम आदमी पार्टी), प्राचार्य डी. जी. तांदळे (जिल्हाध्यक्ष - महाराष्ट्र राज्य किसान सभा, बीड), राजकुमार कदम (सरचिटणीस - मराठवाडा शिक्षक संघ), धनंजय सानप (जिल्हाध्यक्ष - महाराष्ट्र आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटना), संजय भालशंकर, भाई गौतम आगळे (नेते - रोजंदारी मजूर सेना), शेतकरी हक्क मोर्चाचे सुहास जायभाये, माईकल अशोक वाघमारे, संभाजी कदम लोणीकर आदींनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अजितदादांनी केलेली विविध विकासकामे बीडकरांच्या मनात कायमस्वरूपी स्मरणात राहतील, असे यावेळी सांगण्यात आले.

साप्ताहिक, विश्वनायक हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **शेख बिलाल शेख युसूफ** यांनी मुद्रक, जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै, जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून साप्ताहिक विश्वनायक कार्यालय, घर क्रं.१/१०/६६ खासबाग, खाजानगर, तुळजाभवानी मंदिर जवळ, ता,जि, बीड, महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, **(साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. *वाद विवाद जिल्हा न्यायालया अंतर्गत)** मो. 8686888898
ई-मेल- vishvanayak94@gmail.com

The weekly newspaper, Vishvanayak, is published by its publisher, owner, and editor, Sheikh Bilal Sheikh Yusuf. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Vishvanayak Weekly office, House no.1/10/66,Khasbag, Khajanagar, near Tuljabhavani Temple, Taluka & District Beed, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news in the weekly publication.*Disputes are subject to the jurisdiction of the district court) Mobile: 8686888898 - Email: vishvanayak94@gmail.com